भूसंपादन अधिनियम, १८९४ व भूसंपादन अधिनियम, २०१३ चे अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे व तद्नुषंगीक कार्यवाहीबाबत आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त स्तरावर समितीचे गठन करण्याबाबत .

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/PIL-३४/प्र.क्र.१०४/भाग-१/अ-४.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ०३ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> :- महसूल व वन विभागाचे समक्रमांकाचे संकेतांक क्रमांक २०१८०२२८१७१६१९७३१९, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८चे शासन परिपत्रक.

प्रस्तावना :-

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेली जनहित याचिका क्र.३४/२०१७ मध्ये मा. न्यायालयाने दि.१.०३.२०१८ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान भूसंपादन प्रक्रिया व मोबदला वाटप प्रकिया याबाबत उहापोह झाला. न्यायालयीन आदेश /शासन निर्णय / परिपत्रके यांची क्षेत्रिय स्तरावर अंमलबजावणी करत असतांना सुसुत्रतेने व पध्दतशीरपणे न करता दिरंगाई व नियोजनशून्य पध्दतीने (Haphazard Manner) करण्यात येत आहे. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करतांना लहान रक्कमांचे जुने निर्णयांवर मोबदला वाटपाची कार्यवाही न करता मोठ्या रक्कमांच्या नवीन न्यायालयीन निर्णयाचा आधी विचार केला जातो. याकरीता वेळोवेळी दिलेले न्यायालयीन आदेश / शासन निर्णय / परिपत्रके / धोरणात्मक निर्णय यांची कालबध्द मर्यादेत अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

त्याकरीता सर्व विभागांसाठी संबंधित विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर एक सनियंत्रण समिती (Monitoring Committee) नेमण्याबाबतचा विषय शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने सर्वंकष विचार करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :-

१) विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील एक सनियंत्रण समितीची (Monitoring Committee) स्थापना करण्यात यावी. सदर समितीची रचना खालील प्रमाणे राहील.

१) विभागीय आयुक्त	- अध्यक्ष,
२) अध्यक्ष निवडतील असे त्या विभागातील दोन जिल्हाधिकारी	- सदस्य,
३) उप जिल्हाधिकारी (समन्वय) (आयुक्त मुख्यालयाच्या जिल्हयातील)	- सदस्य,
४) नगर रचनाकार, आयुक्त कार्यालय (निवाडा शाखा)	- सदस्य,
५) उपायुक्त (भूसंपादन),आयुक्त कार्यालय	- सदस्य सचिव

२) भूसंपादन अधिनियम १८९४ व भूसंपादन अधिनियम, २०१३ चे अनुषंगाने न्यायालयीन आदेश / शासन निर्णय / परिपत्रके / धोरणात्मक निर्णय यांची प्रभावीपणे, कालबध्द मर्यादेत सुसूत्रतेने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या समितीची राहील.

३) माहिती गोळा करणे / डाटा वेळोवेळी संकलीत करणे /जपून ठेवणे व जरूर वाटल्यास उपलब्ध करून देणे ही समितीची जबाबदारी राहील.

४) वरील आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी समितीची राहील. तसेच, अंमलबजावणी झाली किंवा कसे व काही अडचणी येत असल्यास त्या दूर करणेबाबत करावयाची उपाय योजना याची माहिती वेळोवेळी संक्षिप्त स्वरूपात मा. उच्च न्यायालयास / शासनाला उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्या करीता विभागीय आयुक्तांचे अधिनस्त कनिष्ठ कार्यालयांकडून माहिती गोळा करणे व मा. उच्च न्यायालय / शासन यांनी वेळोवेळी दिलेले आदेश / निर्णय कनिष्ठ कार्यालयांकडे सुपूर्द करणे अशा पध्दतीने ही सनियंत्रण समिती मा. उच्च न्यायालय / शासन व कनिष्ठ कार्यालये यामध्ये दुवा म्हणून (Two Way Communication) काम करील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०४०३१६४४५५५४१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Asha Shailesh Dahake

Digitally signed by Asha Shailesh Dahake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bdc3a70507686db48462c677bbbc5032947f8b7f5be3fb7ff1eaf137f7771f4b, cn=Asha Shailesh Dahake
Date: 2018.04.03 16:45:44 +05'30'

(आशा डहाके)

सहायक संचालक नगर रचना तथा अवर सचिव,

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई ३२.
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३) मा.मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ३२.
८) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व जिल्हा सरकारी वकील
१२) निवडनस्ती (अ-४)
१३) कार्यासन अ-१, अ-२, अ-३, अ-४.